**विशेष दिवाणी दावा क्र.०१/२०२३**
(CNR No.MHSO220008752023)

## निशाणी क्र.३८६ वरील आदेश

(बन्सी घाडगे वि. महाराष्ट्र शासन वगैरे)

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथन असे की, वादीने प्रतिवादी विरुध्द साठेखतावरुन खरेदीखत होऊन मिळणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. सदर दावेकामी वादीचा पुरावा झालेला आहे व प्रतिवादीचा पुरावा चालु झालेला आहे. तारीख १३.१२.२०११ व तारीख २४.०५.२०१२ रोजीची खरेदीखते दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना झालेली असलेमुळे मालमत्ता हस्तांतरण कायद्यान्वये अवैध व बेकायदेशीर आहेत व त्याबाबत दाव्यात नमूद केलेले आहे. तथापि दावा कलम २३ मधील विनंती कलम ब मध्ये वरील दिनांक नमूद करणेचे केवळ नजरचुकीने व अनावधानाने राहून गेलेले आहे. त्यामुळे दाव्यामध्ये खालीलप्रमाणे दावा दुरुस्ती करणेची आहे. दावा कलम २३ ब मध्ये ओळ क्र.६ मध्ये '०२.०२.२००८ नंतर फक्त 'तारीख १३.१२.२०११ व तारीख २५.०५.२०१२' असे लिहणेत यावे. सदर दुरुस्ती किरकोळ स्वरुपाची असून त्यामुळे दाव्याचे मुळ विषयावर कोणताही परिणाम होत नाही. अगर त्यामुळे प्रतिवादीवर अन्याय देखील होत नाही तसेच वादी प्रतिवादी दरम्यान भविष्यात पुन्हा दावे होणार नाहीत. नमूद केलेप्रमाणे दावा दुरुस्ती करणेसाठी न्यायाचे व हिताचे दृष्टीने परवानगी देणेची विनंती केली.

३. प्रतिवादी क्र.९(ब) यांनी अर्जास म्हणणे देऊन कथन केले की, वादी व प्रतिवादींचा पुरावा संपलेला आहे. सदर टप्प्यावर अर्ज कायद्याने चालू शकत नाही. अर्जास आदेश ६ नियम १७ ची बाधा येत आहे. अर्ज नामंजूर करावा अथवा वादींना जास्तीत जास्त कॉस्ट करावी.

४. प्रतिवादी क्र.१५ यांनी अर्जास म्हणणे देऊन कथन केले की,अर्जातील मजकुर खोटा व लबाडीचा असून तो यातील प्रतिवादी यांना मुळीच मान्य व कबूल नाही यातील वादी यांनी मागितलेली दुरुस्ती ही बेकायदेशीर असून प्रस्तुतचा दावा सुनावणीसाठी असून वादी यांचा पुरावा संपलेला आहे. तसेच प्रतिवादी यांचा पुरावा चालू आहे. वादी यांना कायद्याने या टप्प्यावर दावा दुरुस्त करता येणार नाही. यापूर्वी वादीने चार ते पाच वेळा दावा दुरुस्त केलेला असून नियोजीत मागणी केले प्रमाणे वादी यांना दुरुस्ती कायद्याने करता येणार नाही. सदरचे प्रकरण हे फार जुने असून विनाकारण प्रस्तुतचा अर्ज दिल्यामुळे प्रकरणात विलंब होत आहे. सर्व कायदेशीर बाबींचा व तरतुदींचा विचार करुन वादी यांचा दावा दुरुस्तीचा अर्ज नामंजूर करणेत यावा. यदा कदाचित वादी यांचा अर्ज मंजूर झालेस वादी यांचेकडून प्रतिवादी यांना कॉस्ट मिळणेबाबत आदेश होण्याची विनंती केली.

५ . अर्ज, अर्जावरील म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. वादी प्रतिवादी तर्फे करण्यात आलेल्या युक्तीवादाचा परामर्श घेतला. तसेच दिवाणी पक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चे अवलोकन केले ते पुढीलप्रमाणे

**O-VI Rule- 17. Amendment of pleadings—**

> "...The Court may at any stage of the proceedings allow either party to alter or amend his pleadings in such manner and on such terms as may be just, and all such amendments shall be made as may be necessary for the purpose of determining the real questions in controversy between the parties.
>
> Provided that no application for amendment shall be allowed after the trial has commenced, unless the Court comes to the conclusion that in spite of due diligence, the party could not have raised the matter before the commencement of trial..."

वादीचे विधिज्ञ श्री.डी. आर. देसाई यांनी त्यांचे युक्तीवादाचे पुष्टयर्थ खालील मा. उच्च न्यायालयाचे न्यायनिर्णयाचा आधार घेतला.

**Prameshwar Dhondiba Umbre Vs.Mahadeo Waman Raut and Others (2011 (3)BCJ 679).** Wherein it is held that ' even if the amendment prayed for is belated, while considering such belated amendment, the

Court must bear in favour of doing full and complete justice in the case where the party against whom the amendment is to be allowed, can be compensated by costs.'

प्रतिवादी क्र.१५ चे विधिज्ञ श्री. ए. ए. पाटील यांनी त्यांचे युक्तीवादाचे पुष्टयर्थ खालील मा. उच्च न्यायालयाचे न्यायनिर्णयाचा आधार घेतला.

**Mahadevi Annasaheb Jagtap Vs. Shilabai Popat Lambe and Ors.(MANU/ MH/2429/2020)**. Wherein it is held that '...the petitioner seeking amendment does not show why the proposed amendment was not incorporated prior to the commencement of the trial. There is nothing in the application to show that despite exercising due diligence the proposed amendment could not be incorporated earlier...'

६. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींचे विरुध्द दावा मिळकतीचे साठेखतावरुन खरेदीखत करुन मिळणेकरीता तसेच दावा मिळकती पैकी २/३ जमिनीचे झालेले खरेदीखत रदद होऊन मिळण्याकरीता तसेच निरंतर ताकीद मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. वादीचे कथनाप्रमाणे दाव्याचे कामकाज चालु असताना दिनांक १३.१२.२०११ तसेच दि.२५.१२.२०१२ ला दावा मिळकती संदर्भात खरेदीखते झालेली आहेत. सदरचे खरेदीखते अवैध व बेकायदेशीर आहेत ही बाब दाव्यामध्ये नमूद केलेल्या आहेत. केवळ दावा कलम २३(ब) मध्ये प्रस्तुतच्या तारखा अनावधानाने व नजरचुकीने नमूद करण्याचे राहून गेले आहे. सबब सुचित दुरुस्ती करीता परवानगी मिळणेची विनंती केली. वादी तर्फे प्रस्तुत दाव्यामध्ये निशाणी २३६ वर दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल करण्यात आला होता. सदर अर्जावर प्रतिवादीचे म्हणणे दाखल झाल्यानंतर न्यायालयाने आदेश केला. सदर आदेशानंतर दावा कलम २२ मध्ये दुरुस्ती करण्यात आली. सदर दुरुस्ती पुढीलप्रमाणे–सन २००७, २००८ व २०११ मध्ये दावा मिळकतीबाबत खरेदी विक्रीचे व्यवहार झाले आहेत. करीता सदरची खरेदीखते

बेकायदेशीर ठरवून मिळणेबाबत तसेच दिनांक १३.१२.२०११ रोजी नोंदणकृत खरेदीखत झाल्याचे दावा कलम २१ मध्ये दुरुस्ती करण्यात आली. दावा कलम २१ व २२ मध्ये दिनांक २६.०७.२०१९ दुरुस्ती झालेली आहे. सदर दुरुस्तीच्या वेळी वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे दावा कलम २३(ब) मध्ये दुरुस्ती करण्याचे अनावधानाने राहून गेल्याचे कथन केले आहे. वादी तर्फे सदर अर्जाच्या कथना पुष्टयर्थ दाखल करण्यात आलेली खरेदीखते वर्णन यादी नि.३९३/१ ते नि.३९३/५ चे अवलोकन केले असता खरेदीखत दस्त क्र.४७०२/२०११ दि.१३.१२.२०११ ला झालेले आहे. सदर खरेदीखताबाबत वादीने निशाणी २३६ ला केलेल्या अर्जा अन्वये दावा कलम २१ व २२ मध्ये दुरुस्ती करण्याकरीता सदर दुरुस्तीमध्ये केवळ दि.१३.१२.२०११ रोजीच्या खरेदीखताबाबत कथन केले आहे. त्या अन्वये दुरुस्ती करण्यात आलेली होती. त्यामुळे दावा कलम २३ (ब) मध्ये ओळ क्र.६ मध्ये दिनांक ०२.०२.२००८ नंतर १३.१२.२०११ ही बाब नमूद करण्याचे अनावधानाने राहून गेल्याचे निदर्शनास येते.

७. खरेदीखत दस्त क्र.१८६१/२०१२ हे दिनांक २५.०५.२०१२ रोजी झाल्याचे दिसून येते. सदर दुरुस्ती अर्जापूर्वी बऱ्याच वेळा दाव्यामध्ये दुरुस्त्या केलेल्या आहेत. प्रस्तुत दाव्यामध्ये न्यायालयाने दि.१५.११.२०१९ रोजी अतिरिक्त मुददे काढलेले आहे. सदरचा अर्ज कथीत खरेदीखताबाबत उशीरा देण्याचे कारण अर्जात नमूद केलेले नाही. सदरची दुरुस्ती ही अनावधानाने राहून गेली आहे असे वादीचे कथन कायद्यातर्गंत ठरत नाही. तसेच नि.२३६ अन्वये दाव्यात दुरुस्ती झाली. सदर दुरुस्तीच्या वेळी देखील दिनांक २५.०५.२०१२ रोजीच्या खरेदीखताचा उल्लेख करुन दाव्यात दुरुस्ती झालेली नाही. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीचा पुरावा संपलेला असून प्रतिवादीचा पुरावा चालू आहे. प्रस्तुतची दिनांक २५.०५.२०१२ ची दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरुपात बदल होत असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे सदरची

दुरुस्ती ही दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ च्या कक्षेत येत नाही. याउलट वादीने प्रस्तुत अर्जामध्ये दि.१३.१२.२०११ च्या खरेदीखताबाबत सुचवलेली दुरुस्ती ही अनावधानाने दाव्यात नमूद करावयाचे राहिल्याचे निदर्शनास येते. करीता सदरची दुरुस्ती ही दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नि.१७ च्या कक्षेत येत आहे. वादी तर्फे दाखल मा.उच्च न्यायालयाच्या न्यायानिर्णयातील न्यायतत्वे अंशतः वादीच्या कथनास मिळती जुळती असल्याने वादीस अंशतः उपयुक्त ठरतात. प्रतिवादी तर्फे दाखल मा.उच्च न्यायालयाच्या न्यायानिर्णयातील न्यायतत्वे अंशतः प्रतिवादीच्या कथनास मिळती जुळती असल्याने प्रतिवादीस अंशतः उपयुक्त ठरतात. प्रस्तुतचा अर्ज हा अंशतः दिवाणी प्रकिया संहिता आदेश ६ नियम १७ च्या कक्षेत येत असल्याने प्रस्तुतचा अर्ज हा अंशतः मंजूर होणेस पात्र आहे. सबब मी पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज खर्च रक्कम रुपये २,०००/– सह अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.९(ब) तसेच प्रतिवादी क्र.१५ यांना पुढील तारखेपर्यंत वादीने द्यावयाची आहे.

३. वादीने अर्जात सुचवलेली दुरुस्ती दावा कलम २३(ब) ओळ क्र.६ मध्ये ०२.०२.२००८ नंतर दि.१३.१२.२०११ असे लिहून विहीत मुदतीमध्ये दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत देखील विहीत मुदतीत दाखल करणेचे आदेशित करण्यात येत आहे.

४. अर्जदाराने विहित मुदतीत पूर्तता न केल्यास अर्ज आपोआप नस्तीबंद समजण्यात येईल.

EKHE MEENA PRAKASH
Digitally signed by EKHE MEENA PRAKASH
Date: 2024.06.29 17:21:49 +0530

स्थळ – करमाळा
दिनांक – २९.०६.२०२४

(मीना प्र. एखे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of the this P.D.F file Order/Judgment are same word to word, as per the original order/ judgment

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | B.R.Kondekar |
| Court Name | : | Civil Court Senior Division, Karmala |
| Date | : | 29.06.2024 |

Order/Judgment signed
by the Presiding Officer on : 29.06.2024

Order uploaded on : 29.06.2024